आजचा शुभ विचार

"एक महान माणूस एका प्रतिष्ठित व्यक्तिपेक्षा वेगळा असतो कारण तो समाजाचा सेवक होण्यास तयार असतो."



RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com

पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!






मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-06 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Saturday 03 May 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ०६ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शनिवार, दि. ०३ मे २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## राजस्थानमधील जैसलमेरमधून पाकिस्तानच्या गुप्तहेराला अटक

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------

राजस्थानमधील जैसलमेरमधून पाकिस्तानच्या गुप्तहेराला अटक करण्यात आली आहे. पठाण खान असे या गुप्तहेराचे नाव आहे. तो भारताशी संबंधित महत्त्वाची माहिती पाकिस्तानला पुरवत होता. पठाण खान हा आयएसआय या पाकिस्तानच्या गुप्तहेर संघटनेसाठी काम करत होता. राजस्थानमध्ये इंटेलिजन्सच्या पथकाने महिन्याभरापूर्वी पठाण खान याला अटक केली. त्याची महिनाभर चौकशी सुरू होती. आता त्याच्या विरुद्ध १९२३ च्या अधिकृत गुपिते कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पठाण खान याला १ मे २०२५ रोजी गुन्हा नोंदवून औपचारिक अटक करण्यात आली. हाती आलेल्या माहितीनुसार, पठाण खान पहिल्यांदा २०१३ मध्ये पाकिस्तानमध्ये हेरगिरीच्या प्रशिक्षणासाठी गेला होता. यानंतरही अधूनमधून तो पाकिस्तानमध्ये जाऊन आला आहे. पठाण खानने अनेकदा भारताशी संबंधित महत्त्वाची माहिती पाकिस्तानला पुरवली आहे. पठाणने नेमकी कोणकोणती माहिती



पाकिस्तानला दिली आहे. या माहितीचा पाकिस्तानकडून गैरवापर होऊ नये म्हणून काय काळजी घ्यायची याबाबतचे नियोजन सध्या सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार पठाण खानला पाकिस्तानकडून वेगवेगळ्या मार्गाने हेरगिरीसाठी पैसा दिला जात होता.

**पाकिस्ताकडून सलग आठव्या रात्री शस्त्रसंधीचे उल्लंघन**

पाकिस्तानने सलग आठव्या रात्री शस्त्रसंधीचे उल्लंघन करुन भारताच्या चौकी - पहारे यांना लक्ष्य करुन गोळीबार केला. भारताने पाकिस्तानच्या गोळीबाालाा चोख प्रत्युत्तर दिले. जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी २६ नागरिकांची हत्या केली. या अतिरेकी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला आहे. तणाव वाढू लागल्यापासून सातत्याने पाकिस्तान शस्त्रसंधीचे उल्लंघन करत आहे आणि भारताकडून त्याला प्रत्युत्तर दिले जात आहे. पाकिस्तानने लहान शस्त्रांद्वारे कुपवाडा, बारामुला, पूँछ, नौशेरा, अखनूरमध्ये भारताच्या चौकी - पहाऱ्यांना लक्ष्य करुन गोळीबार केला. भारत - पाकिस्तान सीमेवर गोळीबार सुरू असल्यामुळे दररोज कित्येक तास स्थानिकांना बंकरमध्येच वास्तव्य करावे लागत आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी सरकारी योजनेत सीमेजवळच्या शेकडो गावांमध्ये दर्जेदार बंकर बांधण्यात आले आहेत. या बंकरमध्ये नागरिक सुरक्षित आहेत. आंतरराष्ट्रीय सीमेवरील आरएस पुरा आणि अर्निया सेक्टरमध्ये पिकांची कापणी पूर्ण झाली असली तरी, कठुआ, सांबा, राजौरी आणि पूंछ जिल्ह्यांमध्ये अजूनही सुरू आहे. पठाणकोट हल्ल्यानंतर भारताने सिंधू नदी पाणी वाटप करार स्थगित केला आहे. पाकिस्तानच्या नागरिकांना दिलेले व्हिसा रद्द केल्याचे भारताने जाहीर केले आहे. भारत - पाकिस्तान राजनैतिक संबंध कमी करण्यात आले आहेत.

## जातीनिहाय जनगणनेतून प्रत्येक वर्गाला न्याय मिळणार - चंद्रशेखर बावनकुळे

प्रवीण उंबरकर
अमरावती प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

केंद्र शासनाने जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे प्रत्येक घटकाचे प्रतिनिधित्व माहिती होण्यास मदत मिळणार आहे. यातून आलेल्या संख्यात्मक आकडेवारीतून त्या-त्या घटकांसाठी विकासात्मक योजना राबविण्यास मदत होईल. यातून मागास वर्गासह प्रत्येक वर्गाला न्याय मिळणार असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.





वरुड तहसील कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान घेण्यात आले. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार सुधाकर कोहळे, उमेश यावलकर, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार आदी उपस्थित होते.

श्री. बावनकुळे म्हणाले, शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवून त्यांचे जीवन सुखकर करण्यात येत आहे. जिवंत सातबारा ही मोहीम राबवून सातबारावरील मृत्यू झालेल्यांची नावे वगळून केवळ जिवंत व्यक्तींच्या नावांचे सातबारे शेतकऱ्यांना घरपोच वितरित करण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला पांदण रस्त्याचा प्रश्न निकाली काढण्यात येत आहे. बंधारे बांधणे, नाला खोलीकरणनातून काढण्यात आलेले गौण खनिज या रस्त्यासाठी उपयोगात आणले जात आहे. शेतकऱ्यांना दुपारी १२ तास वीज उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यासोबतच सर्वसामान्य नागरिकांना शासनाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा फायदा प्रत्येक नागरिकांनी घ्यावा. प्रशासनाने ही त्यांना सहकार्य करून त्यांच्या तक्रारी येणार नाहीत याची काळजी घ्यावी. नागररिकांना शासनाच्या सुविधा मिळण्यास अडचणी येत असल्यास थेट संपर्क करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.


यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार उमेश यावलकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान, मतदान कार्ड वाटप, पीएम किसान सन्मान निधीची वाटप, ट्रॅक्टर वाटप आदी योजनांच्या लाभाचे वाटप करण्यात आले.

## भारताचे पाकिस्तानला सडेतोड उत्तर, हाणून पाडले सायबर हल्ल्यांचे प्रयत्न

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

पहलगाम दहशवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात कठोर पाऊल उचलली आहे. यामुळे सध्या दोन्ही देशांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. अशात आता पाकिस्तानातून भारतीय संकेतस्थळांवर सातत्याने सायबर हल्ले करण्याचे प्रयत्न होत आहेत. " सायबर ग्रुप HOAX1337" आणि "नॅशनल सायबर क्रू" सारख्या पाकिस्तान-पुरस्कृत हॅकर गटांनी काल (गुरुवारी) काही संकेतस्थळे हॅक करण्याचे अयशस्वी प्रयत्न केले. सायबर सुरक्षा संस्थांना पाकिस्तानातून हॅकिंगचे होत असल्याचे लक्षात येताच त्यांनी ते परवून लावले. ताज्या सायबर हल्ल्यात, आर्मी पब्लिक स्कूल नागरोटा आणि सुंजवानच्या संकेतस्थळांना लक्ष्य करण्यात आले होते. ज्याद्वारे पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांची खिल्ली उडवणाऱ्या प्रयत्न करण्यात आला. दुसऱ्या एका घटनेत, माजी सैनिकांच्या आरोग्यसेवेशी संबंधित असलेल्या संकेतस्थळाचे



स्वरूप विकृत करण्यात आले होते. सततच्या होणाऱ्या या सायबर हल्ल्यांमुळे पाकिस्तानच्या वाढत्या नैराश्याचे संकेत मिळत आहेत. पाकिस्तानमधून काम करत असलेल्या हॅकर्सनी मुले, वृद्ध सैनिक आणि इतर निष्पाप लोकांशी संबंधित संकेतस्थळांवर हल्ले करण्याचे वारंवार प्रयत्न केले आहेत. २९ एप्रिल रोजी, मिशन-क्रिटिकल नॅशनल नेटवर्क अभेद्य असल्याचे आढळल्यानंतर पाकिस्तानने सार्वजनिकरित्या उपलब्ध असलेल्या कल्याणकारी आणि शैक्षणिक वेबसाइट्सकडे आपले प्रयत्न वळवले होते. " आयओके हॅकर" इंटरनेट ऑफ खिलाफा या टोपणनावाने कार्यरत असलेल्या या गटाने संकेतस्थळांची मुखपृष्ठे खराब करण्याचा, ऑनलाइन सेवांमध्ये व्यत्यय आणण्याचा आणि वैयक्तिक माहिती चोरण्याचा प्रयत्न केला.

**पाकिस्तानविरोधात भारताची कठोर पाऊले**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात कठोर पाऊले चरण्यास सुरुवात केली आहे. याचाच भाग म्हणून भारताने सिंधू जल करार स्थगित गेला आहे. तसेच भारतात असलेल्या सर्व पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्याची आदेश दिले आहेत. भारताच्या या निर्णयानंतर पाकिस्ताननेही त्यांची हवाई हद्द भारतासाठी बंद केली आहे. याचबरोबर हजारे भारतीय नागरिक पाकिस्तानातून मायदेशात परतले आहे.

**एनआयएकडून पहलगाम हल्ल्याबाबत खुलासे**

दरम्यान, केंद्र सरकारने पहलगाम हल्ल्याचा तपास एनआयएकडे सोपवला आहे. एनआयएने त्यांच्या प्राथमिक तपासात पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या नियोजनात आणि अंमलबजावणीत पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबा, इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजेंस (आयएसआय) आणि पाकिस्तानी लष्करातील घटकांचा सहभाग असल्याचे ठोस पुरावे उघड केले आहेत. एनआयएच्या तपासात असे आढळून आले आहे की, या भयानक हल्ल्यापूर्वी दहशतवाद्यांनी बेताब खोऱ्यात त्यांची शस्त्रे लपवली होती, असे सूत्रांनी टाइम्स नाऊला सांगितले आहे. यासाठी त्यांना ओव्हरग्राउंड वर्कर्सकडून मदत मिळाली होती. ओव्हरग्राउंड वर्कर्सनी दहशतवाद्यांना स्थानिक पातळीवर महत्त्वाची माहिती पुरवल्याचा आरोप आहे. एनआयएच्या सूत्रांनुसार, दहशतवादी अजूनही दक्षिण काश्मीरच्या जंगलात लपले असण्याची शक्यता आहे.

## "मी हिंदू आहे हे सांगायला कुठल्या महाजनची गरज नाही", जितेंद्र आव्हाडांचं वक्तव्य चर्चेत

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अलीकडेच एक वक्तव्य केलं होतं. ते म्हणाले होते "माझ्या बाबतीत अर्ध सत्य सांगितलं जातं पण, मी लहानपणापासूनच पूजा करतो. मुख्यमंत्री असताना तीन ते चार वेळा पंढरपूरच्या विठ्ठलाची पूजा केली, त्याचबरोबर तुळजापूरलाही जाऊन पूजा करतो. यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते प्रकाश महाजन यांनी शरद पवार आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर टीका केली होती. महाजन म्हणाले होते की "शरद पवार म्हणाले लहानपणी देवपूजा करत होतो, आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ते त्यांची मुंज झालेली पण दाखवू



शकतात." प्रकाश महाजन म्हणाले, " शरद पवारांच्या लक्षात आलंय की हिंदू धर्मापासून दूर जाऊन राजकारण करता येत नाही! जितेंद्र आव्हाडांना तुळजाईचं मंदिर बांधावं लागलं ही हिंदूंची ताकद आहे." यावर आता आमदार आव्हाडांनी पलटवार केला आहे. आव्हाड म्हणाले, "यात ताकदीचा काय प्रश्न आहे? आपणा सर्वांच्या माहितीकरिता सांगू इच्छितो, २००४ साली हे मंदिर उभं राहिलं. परंतु, हे रहदारीच्या रस्त्यात असल्यामुळे तत्कालीन महापालिका आयुक्त व न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शनानुसार सदर मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा मानस गेली अनेक वर्ष माझ्या मनात होता. कदाचित हे राज्यातील पहिले असे मंदिर असेल ज्यात बांधकामाची तसेच मंदिर वापराची परवानगी घेतली आहे. त्यामागे माझी तुळजा भवानी मातेवरील नितांत श्रद्धा आहे."

**"मी हिंदू आहे हे सांगायला कुठल्या महाजनची गरज नाही"**

जितेंद्र आव्हाड म्हणाले, " समस्त बहुजनांची उभ्या महाराष्ट्राची कुलदेवी असलेल्या तुळजाभवानी आईचे हे प्रतितुळजापूर देऊळ असंख्य भक्तांचे शक्तीस्थान ठरेल. इतिहास साक्षी आहे, छत्रपती शिवरायांचे देखील तुळजाभवानी मंदिर प्रेरणास्थान होते. आई तुळजाभवानीनेच उभ्या महाराष्ट्राला मोगलाई विरोधात उभे ठाकण्याची ताकद दिली. आमच्यासारख्या बहुजनांना तुमच्यासारख्यांनी पिढ्यानपिढ्या वंचित ठेवलं. शिक्षण, पाणी, न्याय आणि हक्कांसाठी आम्हासारख्यांना मुंज करण्याची आवश्यकता नाहीये. ते तुम्हालाच लखलाभ असू द्या. आणि हो आपणही संपूर्ण कुटुंबासहित उभ्या महाराष्ट्राची कुलदेवी असणाऱ्या तुळजाभवानी आईच्या दर्शनाचा लाभ घ्यावा. आपले मंदिर व्यवस्थापन समितीतर्फे स्वागतच असेल. जय तुळजाभवानी! तसेच, मी हिंदू आहे हे सांगण्यासाठी कुठल्या महाजन ची गरज नाही"


अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७



शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

संपादकीय

# 'मास्टरस्ट्रोक'चे 'मंडल'!

जातनिहाय जनगणनेचा विषय राजकीय नफ्यातोट्यासाठी वापरला जाईल, म्हणून ती करूच नये असे एके काळी म्हणणारेच आता अशी गणना अपरिहार्य मानताहेत... जी कृती करणे इतके दिवस समाजात दुभंग निर्माण करणारे होते, जिची मागणी करणारे आतापर्यंत 'अर्बन नक्षल' ठरवले गेले, जे होऊ नये म्हणून अलीकडे 'बटेंगे तो कटेंगे' ची हाक दिली गेली, जिचा पुरस्कार करणे हे 'मतांचे राजकारण' करणे होते तो जातनिहाय जनगणनेचा निर्णय अखेर भाजप सरकारने घेतला. त्याबद्दल सरकारचे अभिनंदन करावे की ही मागणी सातत्याने लावून धरणाऱ्या विरोधकांचे; हा प्रश्न. विरोधकांनी केलेली मागणी आधी फेटाळायची, ती करणाऱ्यांची हेटाळणी करायची, शेलक्या विशेषणांनी त्यांना दूषणे द्यायची आणि फार रेटता येत नाही असे दिसल्यावर १८० अंश उलटे फिरून तीच मागणी मान्य करायची या शैलीची आता देशवासीयांस सवय झालेली असल्याने सदर निर्णयाच्या श्रेयवादात न पडणे शहाणपणाचे. तथापि सत्ताधीशांच्या या घूमजावी कार्यशैलीमुळे, वैचारिक गुलामी आणि विचारशून्यतेतून सरकार म्हणेल त्याचे कौतुक करणारे जल्पक बिचारे तोंडावर आपटतात. त्यांची तेवढी कीव येते. एखादा मुद्दा सातत्याने लावून धरावा, बोटे वाकडी होतील इतके विरोधकांविरोधातील मेसेज फॉर्वर्ड करण्यासाठी तन-मन-धन पणास लावून मोबाइल-मर्दन करावे आणि कसे थोबाडले विरोधकांस असे मानून नि:श्वास सोडावा तर ज्यास विरोध केला त्याच निर्णयास 'मास्टरस्ट्रोक' ठरवण्यासाठी पुन्हा घाम काढण्याची वेळ या जल्पकांवर येते. अर्थात त्यास इलाज नाही. विचार करणे 'आऊटसोर्स' केले की असेच होणार. तेव्हा या अशांविषयी सहानुभूती बाळगून केंद्राच्या ताज्या निर्णयावर भाष्य आवश्यक. गेल्या काही वर्षांत अनेक संपादकीयांतून 'लोकसत्ता'ने जातनिहाय जनगणनेची अपरिहार्यता दाखवून दिली. विशेषत: महाराष्ट्रात तापलेल्या मराठा आंदोलनाच्या निमित्ताने कोणत्या जातीची लोकसंख्या किती हे निश्चित करणे अनिवार्य ठरत गेले. फक्त केंद्र सरकारला तेवढी ती निकड जाणवत नव्हती. तरीही राज्यांतून- त्यातही भाजपेतर- जातनिहाय जनगणनेसाठी राजकीय दबाव वाढत आहे आणि त्या मागणीचे अस्तित्व आता नाकारता येणार नाही, हे लक्षात आल्यावर केंद्राने चार वर्षांपूर्वी जातनिहाय 'जनगणनेचे' अधिकार राज्यांस दिले. त्यावरील 'बोलाच्या कढीचा भुरका' (१३ ऑगस्ट २०२१) या संपादकीयातून 'लोकसत्ता'ने त्या निर्णयाच्या मर्यादा दाखवून दिल्या. त्या वेळी संसदेच्या दोन्ही सभागृहांत जातीनिहाय जनगणनेचे अधिकार पुन्हा राज्यांस बहाल करणारे विधेयक एकमताने मंजूर झाले म्हणून सर्व राजकीय पक्षांनी एकमेकांचे अभिनंदन केले. सत्ताधाऱ्यांकडून तर याचे वर्णन राजकीय मुत्सद्देगिरीतील यश असे केले गेले. त्या घटनादुरुस्तीनुसार राज्य सरकारे आता आपापल्या प्रदेशात आरक्षणयोग्य मागास जातींची यादी तयार करू शकतील. तथापि हा निर्णय अपूर्ण होता. कारण राज्यांस भले जरी हा जातनिहाय तपशील कळाला तरी त्यामुळे होणार काय? कारण त्यानंतर पुढचा मुद्दा असणार आरक्षणाचा. त्यास ५० टक्क्यांची सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली मर्यादा ओलांडणे राज्यांसाठी अशक्य. त्यासाठी केंद्राने त्यात पडणे आले. म्हणजे मग त्यासाठी देशव्यापी जातनिहाय जनगणना करणे आले. हे इतके साधे सत्य लक्षात घेण्यास केंद्रास इतका विलंब लागला. हा तपशील येथे नमूद केला कारण केंद्राचा ताजा 'ऐतिहासिक' निर्णय जाहीर करताना माहिती-प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काही राज्यांनी केलेल्या अशा जातनिहाय जनगणनेची संभावना 'केवळ पाहणी' अशी केली. पण राज्यांना तशी पाहणी करण्याचा अधिकार वैष्णव यांच्या सरकारनेच तर दिला होता, हे कसे विसरणार? त्या वेळचा निर्णय हा 'मास्टरस्ट्रोक'. नंतर तो निर्णय निरुपयोगी ठरवून केंद्राने स्वत:च अशी जनगणना करण्याचा निर्णय घेतला. तोही मास्टरस्ट्रोक; हे कसे? या अशा परस्परविरोधी मास्टरस्ट्रोक्सची वेळ केंद्रीय धुरीणांवर का आली ते लक्षात घेतल्यास या विरोधाभासाची अपरिहार्यता लक्षात यावी. यातील पहिला मुद्दा म्हणजे धर्म संकल्पनेने जात या उपसंकल्पनेस झाकून टाकण्याचा प्रयत्न इतक्या वर्षांनंतरही तितका यशस्वी न होणे. भाजपसाठी धर्म महत्त्वाचा. जात नाही. याच प्रयत्नाचा पुढचा भाग म्हणून आता सामाजिक वर्गीकरणोत्तर वर्गीकरण करण्यास सुरुवात झाली असून दलितांतही हिंदू दलित आणि अहिंदू दलित असे कप्प्यांमध्ये कप्पे करणे मार्गी लागले आहे. त्या प्रयोगाच्या यशापयशाचा अंदाज येण्यात काही काळ जाईल. पण तोपर्यंत बिहार आणि आगामी वर्षांत उत्तर प्रदेश राज्यांतील विधानसभा निवडणुकांस सामोरे जावे लागेल. बिहारात नितीशकुमार यांनी अशी जातनिहाय जन-पाहणी केलेलीच आहे. तिची अंमलबजावणी हा मुद्दा असेल. तोच विरोधक लालूप्रसाद यादव आणि मंडळींचा हुकमी एक्का. तो निकामी ठरवणे हेदेखील जातनिहाय जनगणनेच्या मागणीसमोर मान तुकवण्याचे एक महत्त्वाचे कारण. एके काळी जातनिहाय जनगणनेचा विषय राजकीय नफ्यातोट्यासाठी वापरला जाईल, म्हणून ही गणना करू नये असे म्हणणारेच आता जातनिहाय जनगणना किती अपरिहार्य आहे, हे सांगताना दिसतात. या भूमिका बदलाचे श्रेय कितीही नाकारण्याचा खटाटोप केला तरी ते राहुल गांधी यांस द्यावे लागेल. हीच बदलाची भूमिका लक्षात घेऊन राहुल गांधी यांनी बुधवारी जातनिहाय जनगणनेच्या घोषणेनंतर केंद्राच्या निर्णयास पाठिंबा दिला. राहुल गांधी यांचा पाठिंबा स्वीकारण्याची वेळ यावी हे काही सत्ताधीशांस भूषणास्पद वाटणार नाही. पण गांधी केंद्रास पाठिंबा देऊन थांबले नाहीत. त्यांनी या जनगणनेचे वेळापत्रक जाहीर करण्याचा आग्रह धरला. कारण मुळात जनगणना कधी होणार याचाच अंदाज नसेल तर या जनगणनेत जाती नोंदी कधी, कशा केल्या जाणार हे विचारणे निरर्थक ठरते. त्यामुळे या जनगणनेचा कार्यकाल जाहीर करणे आले. बिहार निवडणुका जाहीर होण्याआधी याबाबत स्पष्टता दिसणे आवश्यक. अन्यथा नुसती घोषणा हा 'चुनावी जुमला' ठरवण्याची संधी विरोधकांस मिळेल. त्यापुढील आव्हानाची जाणीव प्रत्यक्ष जनगणनेनंतर होईल. ते आव्हान असेल आकड्यांतून समोर येणाऱ्या सत्याचे. कारण आकडेवारी नेहमीच नग्न सत्य आहे तसे दाखवते. त्यामुळे या आकडेवारीत समजा काही जातींस त्यांच्या वास्तविक संख्येपेक्षा सर्वत्र अधिक प्रतिनिधित्व दिल्याचे उघड झाले तर प्रचंड अनर्थ होऊ शकतो. तसेच, संख्येने अधिक असूनही तितके प्रतिनिधित्व काही जातींस दिले गेलेले नाही, हे सत्य उघड होणे हेदेखील प्रस्थापितांसाठी अडचणीचे ठरू शकते. हे सत्य एकदा का उघड झाले की बाधित जाती/ जमाती, त्यांचे नेते, राजकीय ठेकेदार इत्यादी सर्व या सत्याचा स्वीकार उदार मनाने करतील ही शक्यता शून्य. सर्व मतलबींच्या माहोलात काहींनीच नि:स्वार्थ राहावे अशी अपेक्षा ठेवणेही चूक. म्हणजे त्यापुढील मुद्दा असेल आरक्षण. हे आरक्षण नव्याने स्पष्ट होणाऱ्या सांख्यिकी सत्यानुसारच मिळायला हवे, अशी मागणी पुढे येणार हे उघड आहे. म्हणजे कमी जनसंख्या असूनही जास्त प्रतिनिधित्व ज्यांना दिले गेले आहे त्यांच्या विरोधात जास्त जनप्रमाणानंतरही त्या प्रमाणात प्रतिनिधित्व न मिळालेले, असा संघर्ष उभा ठाकणार. त्यावर मात करायची तर आरक्षणातील ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडणे आवश्यक. म्हणजे त्यासाठी घटनादुरुस्ती आली. ती मागणी राहुल गांधी यांनी आताच केलेली आहे. या मागणीकडे लक्ष देण्याची गरज तूर्त नाही; हे खरे. पण ती फार काळ टाळता येणार नाही; हेही खरे. सबब हा निर्णय 'मंडल आयोग २' ठरणार ही काळ्या दगडावरची रेघ. त्यामुळे 'मास्टरस्ट्रोक'चेही मंडल पूर्ण होईल, इतकाच काय तो फरक

# कु. सुवर्णा देसलेंना पालकमंत्र्यांच्या हस्ते महाराष्ट्र शासन जिल्हा युवती पुरस्काराने सन्मानित

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत





कासारे ता. साक्री येथील श्री. भालचंद्र साहेबराव देसले व सौ. प्रतिभा भालचंद्र देसले यांची सुकन्या तसेच श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय साक्री महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. सुवर्णा देसले यांना १ मे २०२५ महाराष्ट्र राज्य स्थापना दिनी पोलीस मुख्यालय धुळे, येथे महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत धुळे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धुळे द्वारा धुळे जिल्ह्यात युवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल, जिल्हा युवा पुरस्कार (युवती) २०२३-२४ धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री नामदार मा.जयकुमार रावल यांच्या शुभ हस्ते तसेच धुळे जिल्हाधिकारी श्री.जितेंद्र पापळकर, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री अविनाश टिळे. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे साहेब, धुळ्याचे आमदार अनुपजी अग्रवाल, धुळे ग्रामीण आमदार राम भदाणे, सुवर्णाचा भाऊ मा.चेतन शिंदे या प्रमुख पाहुण्यांच्या व शेकडो सन्माननीय मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य- दिव्य अशा महाराष्ट्र दिनाच्या ध्वजारोहण सोहळा कार्यक्रमात कु. सुवर्णा देसले यांना जिल्हा युवा पुरस्कार (युवती) सन २०२३-२४, सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, १०,००० रुपयांचा धनादेश, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले कु. सुवर्णा देसले यांनी विमलबाई पाटील महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, निसर्ग मित्र समिती, प्रवासी महासंघ, मोफत आरोग्य, डोळे तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर, रक्तदान शिबिर, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, पर्यावरण, झाडे लावा- झाडे जगवा, महिला बचत गट, अन्नदान, योग प्राणायाम शिबिर आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल हा सन्मानाचा पुरस्कार मिळाला आहे. यापूर्वीही राजमाता जिजाऊ आदर्श महिला पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे .सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल कु.सुवर्णाचे महाराष्ट्रचे मा. शिक्षण संचालक माननिय बी.डी. देसले, साक्री विधानसभा आमदार मा. सौ मंजुळाताई गावीत, शिवसेना जिल्हा अध्यक्ष डॉ. तुळशीराम गावीत, भाडणेचे लोकनियुक्त सरपंच अजय सोनवणे ,प्रवासी महासंघाचे तालुका अध्यक्ष सुरेश पारख , उपाध्यक्षा सौ.मंगला पारख , सचिव बाळकृष्ण तोरवणे व सर्व पदाधिकारी, सदस्य , ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे जिल्हाध्यक्ष अँड. जे. टी. देसले, तालुका अध्यक्ष प्राचार्य बी.एम. भामरे सर्व पदाधिकारी, निसर्ग मित्र समितीचे संस्थापक अध्यक्ष प्रेमकुमार अहिरे, जिल्हा उपाध्यक्ष विलास देसले डॉ. अजय नांद्रे डॉ. मनीषा पाटील, डॉ. विजय देसले सर्व पदाधिकारी, विमलबाई पाटील महाविद्यालयाचे चेअरमन मंगलाताई देसले, सेक्रेटरी डॉ.अजिंक्य देसले, प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे, व सर्व संचालक मंडळ आणी प्राध्यापक वर्ग , बहुउद्देशीय माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष बी. एस .पाटील व सर्व संचालक मंडळ व शिक्षक वृंद, कासारे गावाचे प्रथम लोकनियुक्त महिला सरपंचा साहेब सौ.सुवर्णा देसले व मा.लोकनियुक्त सरपंच बापूसाहेब विशाल देसले, उपसरपंच व ,सर्व सदस्य ग्रामपंचायत कासारे .संजय देसले- चेअरमन व सर्व सदस्य वि. का. सोसायटी कासारे. महात्मा गांधी तंटामुक्ती समिती चे अध्यक्ष श्री.अनिल लोटन देसले,मा. जिल्हा परिषद सदस्य उत्तमराव देसले ,मोहन भाऊ जैन, गोकुळदादा परदेशी ,दिलीप काकुस्ते , माजी सरपंच सुभाष देसले, सौ माहेश्वरी देसले, सौ क्रांती देसले ,सौ मीनाताई देसले पंचायत समिती सदस्या सौ. माधुरी देसले ,श्री चंद्रकांत देसले, महेंद्र देसले, खान्देश गांधी बाळुबाई मेहता विद्यालयाचे चेअरमन विश्वासराव देसले, मा प्राचार्य विकास देसले, प्राचार्य विनोद सोनवणे , केतन देसले, डॉ. हेमंत पारख व सर्व संचालक मंडळ आणि शिक्षक व कर्मचारी वृंद, प्रहार जनशक्ती साक्री तालुका प्रमुख जयेश बावा, ना. मुकेश जयस्वाल सर्व सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, त्यांचे पदाधिकारी आदींनी अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# वराळ पाटील फार्मसी कॉलेज मध्ये निरोप समारंभ उत्साहात संपन्न

## डी.फार्मसी व बी. फार्मसी च्या विद्यार्थ्यांनी, द्वितीय वर्ष डी. फार्मसी च्या विद्यार्थ्यांना दिला निरोप

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत




पारनेर तालुक्यातील निघोज येथील सहकार महर्षी किसनराव वराळ पाटील कॉलेज ऑफ डी. फार्मसी व बी. फार्मसी कॉलेज मध्ये १ मे रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून कॉलेज मध्ये निरोप समारंभ मोठया उत्साहात संपन्न झाला. यामध्ये डी. फार्मसी च्या व्दितीय वर्षाच्या विदयार्थ्यांना निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेज चे संस्थापक अध्यक्ष रंगनाथ वराळ पा. होते. त्यानंतर सरस्वती मातेच्या व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमीचे पूजन करण्यात आले. व छत्रपती शिवाजी महाराजांची आरती गाऊन व दीप प्रज्वलन करून कार्यकर्माची सुरवात करण्यात आली. या सर्व कार्यक्रमाचा प्रस्तावना कॉलेज चे प्राचार्य डॉ. कुलदीप वैद्य सर यांनी सर्वांच्या समोर मांडला. यामध्ये सर्व प्रथम सर्व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. तसेच डी. फार्मसी व बी. फार्मसीच्या वतीने डी. फार्मसी या व्दितीय वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. व्दितीय वर्षाच्या विदयार्थ्यांनी आपले दोन वर्षातील अनुभव सांगत सर्व शिक्षकांचे कौतुक करत भाषणातून आपल्या भावना व्यक्त केल्या.शिक्षकांनी भाषण करताना पुढील वाटचालीस विदयार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच प्राध्यपिका रेश्मा पवार यांनी आपल्या भाषणातून मुलांना मोलाचे मार्गदर्शन केले. प्राध्यपिका साक्षी वाघमारे हे व्दितीय वर्षाच्या वर्गशिक्षिका असून आपल्या भाषणातून मुलांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देत मोलाचे मार्गदर्शन केले विशेष म्हणजे पारितोषिक प्रमाणपत्र बनवण्याची संकल्पना वाघमारे मॅडम यांनी मुलांना दिली होती . मुलांनी या कार्यक्रमात डान्स, ड्रामा, लावणी, असे आगळे वेगळे कार्यक्रम सादर केले. मुलांमधून स्वप्नील दिसले. व मुलींन मधून समृद्धी लाळगे या दोन विदयार्थ्यांनची सर्व गुण संपन्न विद्यार्थी म्हणून निवड करण्यात आली. या विदयार्थ्यांना अध्यक्षांच्या हस्ते ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. वर्षभरात कॉलेज मध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या मध्ये नामांकित मुलांना कॉलेज तर्फे प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी कॉलेज चे सचिव, विराज वराळ पाटील,शिक्षक संतोष सुपेकर , सर्व शिक्षक व शिक्षेकेतर स्टाफ, सर्व विद्यार्थी, पालक, ग्रामस्त या कार्यक्रमाला उपस्थित होते. तसेच छान प्रकारे भोजनाची व्यवस्था ही करण्यात आली होती. शेवटी कार्यकर्माची सांगता राष्टगीत गाऊन झाली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी सुपेकर, दिव्या लोखंडे, यांनी केले. तर शेवटी आभार प्राध्यपिका निलम इचके यांनी मानले.

विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी मी त्यांना शुभेच्छा देतो. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मी त्यांना मार्गदर्शन करतो. विद्यार्थ्यांनी नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा, कोणत्याही अडचणींना सामोरे जाण्याची तयारी ठेवावी, आणि आपल्या ध्येयाकडे वाटचाल करत राहावे.आजच्या या कार्यक्रमात आपण सर्वजण या विद्यार्थ्यांच्या यशाचे साक्षीदार आहोत. या विद्यार्थ्यांच्या यशाने आपल्या सर्वांना प्रेरणा मिळत आहे. या विद्यार्थ्यांच्या यशाने आपल्या संस्थेचे नाव उजळून निघाले आहे. या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल मी पुन्हा एकदा अभिनंदन करतो आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो."

**रंगनाथ वराळ पा.**
**अध्यक्ष, वराळ पाटील फार्मसी कॉलेज, निघोज.**

# एकीकडे उष्णतेची लाट;तर दुसरीकडे पाण्याचा हाहाकार!!

बदलते हवामान व उष्णतेची लाट यामुळे धरणातील पाणी साठा दिवसेंदिवस कमी-कमी होतांना दिसत आहे. सध्याच्या परिस्थितीत वाढत्या उष्णतामानामुळे राज्यातील जल साठा आतापासूनच ३८ टक्क्यांवर येवून ठेपला आहे आणि पुढील दोन महिने अजून बाकी आहे त्यामुळे जलसाठ्याची घसरगुंडी अत्यंत चिंताजनक असल्याचे दिसून येते. कारण पुणे, विदर्भ, छत्रपती संभाजीनगर, कोकण, मराठवाडा येथील संपूर्ण मोठ्या धरणांचा जलसाठा झपाट्याने खाली घसरत आहे. एकीकडे तापमानाच्या झळा आणि दुसरीकडे पाणीटंचाई अशा दुहेरी कात्रीत राज्यातील अनेक भागातील नागरिक सापडल्याचे दिसून येते.त्यामुळे आतापासूनच पाण्याचे गांभीर्य लक्षात घेता पाण्याचा अपव्यय टाळून योग्य वापर करण्याची गरज आहे.कारण राज्यातील जलसाठ्याची आकडेवारी पहाली तर अत्यंत गंभीर परिस्थितीत आहे ती याप्रमाणे नागपूर ३९ .२७ टक्के, अमरावती ४८.९६ टक्के, पुणे ३२.७० टक्के, छत्रपती संभाजीनगर ३८.७७ टक्के, नाशिक ४२.६४ टक्के कोकण ४८.४१ अशाप्रकारे प्रमुख शहरातील जलसाठ्याची स्थिती आहे आणि दररोज झपाट्याने साठा कमी-कमी होत आहे यावर सरकारने ताबडतोब गांभीर्याने लक्ष केंद्रित करून उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा पुढील दोन महिन्यांत यापेक्षाही गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही.आज राज्यातच नाही भारतासह संपूर्ण जगात पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.त्यामुळे परिस्थितीनुसार पाण्याचा वापर होणे अत्यंत गरजेचे आहे.आज पाणी टंचाईची समस्या जगातील इतर अनेक ठिकाणांसारखीच थायलंडमध्येही आहे.मात्र त्यामुळे सण साजरा करण्याच्या उत्साहात अडचण येऊ नये म्हणून फॉगी स्प्रे, ईको-फ्रेंडली वॉटर गन्ससारख्या गोष्टींचा वापर केला जातो.म्हणजे सणाच्या निमित्ताने सुध्दा पाण्याची बचत केली जाते ही बाब थायलंड कृतीतून सिद्ध होते.त्यामुळे भारतात उन्हाळ्यातील पाण्याची गंभीर समस्या पहाता पाण्याचा एक-एक थेंब वाचविणे अत्यंत गरजेचे आहे.आज महाराष्ट्रासह भारतातील अनेक ग्रामीण भागात पाण्याची गंभीर समस्या आहे.कारण आजही ग्रामस्थांनांना पाण्यासाठी ३ ते ४ किलो मिटर अंतरापर्यंत वनवन हिंडावे लागते ही संपूर्ण परिस्थिती बदलते हवामान, जगातील युद्धजन्य परिस्थिती, जंगलतोड, वनवे लागने, ग्लोबल वॉर्मिंग,समुद्राची पातळी वाढने या संपूर्ण गोष्टींमुळे भुजल साठा दिवसेंदिवस कमी होतांना दिसतो.आजही आपण पहातो की वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा होत आहे म्हणजे पाणी समस्ये गंभीर रूप धारण केले असून पुढे चालून आक्राळविक्राळ रूप धारण करू शकते यालाही नाकारता येत नाही.कारण आजही राज्यासह देशातील अनेक क्षेत्र पाण्याच्या बाबतीत रेड झोनमध्ये असल्याचे सांगितले जाते.कारण संपूर्ण सृष्टी, मनुष्य, संपूर्ण जीवजंतू पाण्याशिवाय जगूच शकत नाही त्यामुळे सरकारने पावसाळ्यात पाणी अडविण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे, पाणी जमीनीच्या पोटात गेले पाहिजे यासाठी युध्दपातळीवर वृक्षलागवड काळाची गरज आहे, औद्योगिकीकरणावर सरकारने लगाम कसली पाहिजे, वाढते शहरीकरण यावरही अंकुश लागायला हवा.कारण निसर्ग सुखरूप रहाला तर सर्वच काही ठीक राहील अन्यथा विनाशकारी प्रक्रिया दिवसेंदिवस वाढतच जाईल म्हणून पाण्याच्या बाबतीत सरकारने सावधगिरीने पाऊल उचलने गरजेचे आहे.वृक्षतोडीची झळ सर्वांनाच भोगावी लागते ही बाब मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कृतीतून सांगितली.नागपूर शहरात विविध विकास प्रकल्पांसाठी शहरातील अनेक भागांत नागपूर महानगरपालिकेव्दारे वृक्षतोड केली जात आहे.पण बदल्यात वृक्षारोपण मात्र शहराच्या बाहेर केले जात असल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात नोंदविण्यात आले.शहरातील झाडे तोडली जात असल्यास शहराबाहेर वृक्षारोपण काय कामाचे, अशा शब्दात नागपूर खंडपीठाने महापालिकेला खडसावत क्रीडा संकुलासह इतर ठिकाणी प्रस्तावित वृक्षतोडीवर अंतरिम स्थगितीही दिली आहे.१ हजार ३७४ वृक्ष तोडण्याचा प्रस्ताव असून या वृक्षतोडीला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली आहे.या वृक्षतोडीच्या बदल्यात गोरेवाड्यात वृक्षारोपण करणार असल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आली.वृक्षतोड शहरात करायची आणि वृक्षारोपण शहराबाहेर करायचे, हे चालणार नाही असे न्यायालयाने मौखिकपणे नमूद केले. यावरून आपण समजू शकतो की वृक्षतोडीमुळे पाण्यासह जीवनाशी निगडित अनेक गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात.शहरातील वृक्ष तोडायचे आणि शहराबाहेर वृक्षारोपण करायचे याला काय अर्थ? अशा शब्दातही उच्च न्यायालयाने नागपूर महानगरपालिकेला खडसावले.यावरून लक्षात येते की शहरीकरणाच्या नावाखाली नागपूरसह राज्यातील अनेक भागांत वृक्षांची कत्तल सुरु आहे ही बाब सिद्ध होते आणि आज राज्यात किंवा देशात जी पाण्याची समस्या भेडसावत आहे व पाणी साठा दिवसेंदिवस कमी-कमी होत आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे फक्त वृक्षतोड व जंगलतोड होय.वृक्ष कटाई पाच मिनिटांत होते.परंतु एक वृक्ष लावून मोठे करायला पाच वर्षे लागतात याचे गांभीर्य सरकारने लक्षात ठेवून जलसंपदा टिकवून ठेवण्यासाठी सरकारने सर्वच स्तरातून वृक्षलागवडीवर भर देण्याची गरज आहे.सरकारमार्फत जेवढी झाडे तोडायची असेल त्याच्या दुप्पट वृक्षलागवड सरकारने प्रथम करावी;नंतर वृक्ष तोडण्याचा निर्णय द्यावा.जय हिंद!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार, नागपूर

# ताहाराबाद विद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------------









ताहाराबाद येथील मविप्र संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज, ताहाराबाद विद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला.सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यालयाचे प्राचार्य दिपक डावरे यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या सुरवातीला प्राचार्य दिपक डावरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकेत श्री.डावरे यांनी महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने सगळ्यांनी मराठी भाषा, मराठी आचार-विचार, मराठी संस्कृती जतन करण्याचे व वाढवण्याचा संकल्प केला पाहिजे असे सांगितले.या वेळी विचारमंचावर, शालेय समिती अध्यक्ष विलासबापू निकम, उपमुख्याध्यापिका श्रीमती आर.आर. सोनवणे , उपपाचार्य सुनील देशमुख, पर्यवेक्षक बी.एस.जगताप,बि.डी नंदन, आर.डी नंदन, नारायण चौधरी, निखिल कासारे, ज्येष्ठ शिक्षक श्री.एस. के. निकम आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने राष्ट्रीय ध्वजारोहण शालेय समिती अध्यक्ष विलास बापू निकम यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना निकालाचे वाटप करण्यात आले.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक जितेंद्र माटे, जे.पी. बच्छाव, के.बी. चव्हाण, आर. जी.संसारे, श्रीमती एस. बी.रौंदळ, एस.आर. दळवी, श्रीमती डी.आर. गावित, एस.जी. गिरी, एस. ए. पवार, एस. यू. भामरे,एस.पी.देवरे, आर. डी. पगार, श्रीमती एस.व्ही. सूर्यवंशी, डी. एल. कापडणीस, जयदीप मोरे, डी.व्ही. सोनवणे, एल.यु.साळवे, वाय. व्ही. पवार तसेच सुनील देवरे, सखाराम अहिरे, निलेश माळी, कुणाल देवरे, धनंजय वणीस, मंगेश पगारे, प्रवीण रौदळ मामा उपस्थित होते.



सिन्नर आगारात कामगार दिन महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला आगार व्यस्थापक हेमंत नेरकर यांच्या हस्ते झेंड्यास सलामी देऊन राष्ट्रगीत महाराष्ट्र गीताने मानवंदना देण्यात आली कामगार कल्याण मंडळाच्या वतीने कामगारांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या प्रसंगी वाहतूक निरीक्षक भरत शेळके ,अण्णा पवार दिगंबर पुरी व आगारातील सर्व कामगार बंधू भगिनी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवा सांगळे यांनी केले





# साक्री येथील विमलबाई पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य बी.एस.पाटील यांच्या ग्रंथ तुलेसाठी प्राप्त झालेले उर्वरित ग्रंथांचे डॉ. सचिन नांद्रे यांच्या हस्ते वाटप.

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------




१६ फेब्रुवारी २०२५ रोजी जिजामाता कॉलेज नंदुरबारचे माजी प्राचार्य तथा श्री. शिवमहाराष्ट्र प्रतिष्ठान संस्थेचे चेअरमन प्राचार्य बी. एस. पाटील यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त साक्री तालुक्यातील व राज्यभरातील प्राचार्य पाटील यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांनी सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त हजारो पुस्तके ग्रंथुलेसाठी दिली होती.सदर पुस्तका तालुक्यातील व नंदुरबार जिल्ह्यातील काही प्राथमिक शाळा, वाचनालय, माध्यमिक शाळा,महाविद्यालय यांना पुस्तके देण्यात येत आहेत. सदर पुस्तकांच्या संचा सोबत पाचशे रुपये किंमतीचे संविधान पुस्तक सर्व लाभार्थी शाळांना देण्यात येत आहेत. याप्रसंगी डॉक्टर नांद्रे यांनी उपस्थित लाभार्थींना उपदेश करताना सांगितले की, पुस्तकासारखा गुरु कोणताच नाही. म्हणून आपण नेहमी सोशल मीडियाचा वापर करण्यापेक्षा पुस्तकांचे वाचन करावे आणि विद्यार्थ्यांनाही पुस्तक वाचनाची आवड निर्माण करावी. प्राचार्य बी एस पाटील यांनी ग्रंथ चळवळ उभी केल्यापासून मलाही वाचनाची आवड निर्माण झाली आहे.म्हणून मी घरातच स्वतःची खाजगी लायब्ररी तयार करीत आहे. श्रीमती विमलबाई पाटील कला व कै. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयात उर्वरित पुस्तकांचे गठ्ठे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे,साक्री तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष बाळकृष्ण तोरवणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.यावेळी सूत्रसंचालन डॉ. कैलास वाघ यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून, डॉ. दिनेश माळी ,डॉ. करुणा अहिरे, प्रा. अशोक भदाणे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे साक्री शाखा सचिव अनिल अहिरे, बाळा मोहिते, प्रा. ए . टी.सैय्यद उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे संयोजन विकास बोरसे यांनी केले.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# ॥ प्रत्येकाला प्रेस स्वातंत्र्याचे महत्त्व पटावे ॥

# ३ मे आंतरराष्ट्रीय पत्रकार स्वातंत्र्य दिन विशेष




दरवर्षी ३ मे हा दिवस प्रेस स्वातंत्र्याच्या मूलभूत तत्त्वांचा उत्सव साजरा करण्यासाठी, जगभरातील प्रेस स्वातंत्र्याचे मूल्यांकन करण्यासाठी, त्यांच्या स्वातंत्र्यावरील हल्ल्यांपासून माध्यमांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या व्यवसायात प्राण गमावलेल्या पत्रकारांना श्रद्धांजली वाहण्यासाठी साजरा केला जातो. सन १९९१मध्ये युनेस्कोच्या महासभेच्या सव्वीसव्या सत्रात स्वीकारलेल्या शिफारशीनंतर सन १९९३मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने जागतिक प्रेस स्वातंत्र्य दिनाची घोषणा केली. त्यावेळेस ऐतिहासिक विंडहोक घोषणापत्र तयार करणाऱ्या आफ्रिकन पत्रकारांच्या आवाहनाला हा प्रतिसाद होता. पत्रकारितेस प्रेरणादायक असा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर महत्त्वपूर्ण संकलित लेख

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटल्या जाणार्या प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य अत्यंत महत्त्वाचे आहे. माध्यमे मुक्त असतील तरच ते आपले काम चोख बजावू शकतील. सत्य समोर आणण्यासाठी आणि आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी मीडियावाले आपला जीवही गमावतात. माध्यमांच्या स्वातंत्र्यावर आणि सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उभे असताना अशी उदाहरणे रोज आपल्यासमोर येतात. कधी स्पष्टवक्ते म्हणून तर कधी मोठे घोटाळे उघडकीस आणण्यासाठी, अनेकदा माध्यमांना आपले कर्तव्य बजावण्याचा फटका सहन करावा लागतो. प्रसारमाध्यमांतील पत्रकारांना अभिवादन करण्यासाठी दरवर्षी ३ मे रोजी जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिन साजरा केला जातो जेणेकरून प्रत्येकाला प्रेस स्वातंत्र्याचे महत्त्व सांगितले जाऊ शकते आणि विचार स्वातंत्र्याचा अधिकार प्रस्थापित करता येईल. यासोबतच आपली जबाबदारी पार पाडताना प्राण गमावलेल्या पत्रकार आणि प्रसारमाध्यमांचे या दिवशी स्मरण केले जाते.

सन १९९३मध्ये ३ मे हा दिवस पत्रकार स्वातंत्र्य दिन म्हणून घोषित करण्यात आला होता. युनेस्कोने २६व्या सर्वसाधारण परिषदेत ३ मे हा प्रेस स्वातंत्र्य दिन म्हणून घोषित केला. दरवर्षी पत्रकार स्वातंत्र्य दिन एका थीमसह साजरा केला जातो या थीमद्वारे डिजिटल मीडियावरील जनतेचा विश्वास आणि या सर्वांच्या परिणामांवरही प्रकाश टाकण्यात येतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा मूलभूत अधिकार आहे आणि जगभरातील घडामोडींची माहिती जनतेला देण्यात प्रेस महत्त्वाची भूमिका बजावते. ग्लोबल कॉन्फरन्स पत्रकार, नागरी समाजाचे प्रतिनिधी आणि राष्ट्रीय अधिकारी यांना उपाय शोधण्यासाठी एकत्र काम करण्याची संधी देते. सन १९४८मध्ये मानवी हक्कांच्या सार्वत्रिक जाहीरनाम्याच्या कलम १९मध्ये प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे, प्रत्येकाला आपले मत निर्भयपणे व्यक्त करण्याचा अधिकार आहे आणि प्रत्येकाला आपले मत व्यक्त करण्यासाठी प्रेसचा वापर करण्याचा अधिकार आहे, यावर भर देण्यात आला आहे. जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिन दरवर्षी ३ मे रोजी साजरा केला जातो. हा दिवस प्रेस स्वातंत्र्याचे महत्त्व आणि लोकशाही, पारदर्शकता, आणि मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी पत्रकारितेच्या भूमिकेची आठवण करून देतो.

जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व: प्रेस स्वातंत्र्य- प्रेस स्वातंत्र्य म्हणजे लोकांना सत्य माहिती मिळवण्याचा आणि व्यक्त करण्याचा अधिकार आहे. लोकशाही- पत्रकारितेमुळे लोकांना सरकार आणि इतर संस्था यांच्याबद्दल माहिती मिळते, ज्यामुळे लोकशाही मजबूत होते. पारदर्शकता- पत्रकारिता लोकांना सरकार आणि इतर संस्था यांच्या कामांबद्दल माहिती मिळवण्यास मदत करते, ज्यामुळे पारदर्शकता वाढते. मानवाधिकार- पत्रकारिता मानवाधिकार आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यास मदत करते. जनजागृती- हा दिवस पत्रकारांना आणि सामान्य लोकांना प्रेस स्वातंत्र्याच्या आव्हानांबद्दल जागरूक करतो. सुरक्षितता- हा दिवस पत्रकारांना त्यांच्या कामात येणाऱ्या अडचणी आणि धोक्यांबद्दल जागरूकता वाढवतो.

जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनाची सुरुवात: संयुक्त राष्ट्र महासभेने १९९३मध्ये हा दिवस जागतिक स्तरावर साजरा करण्याचा निर्णय घेतला. ३ मे रोजी हा दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली.

**जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनाची थीम-**

दरवर्षी, जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनासाठी एक विशिष्ट थीम निवडली जाते, जी प्रेस स्वातंत्र्याच्या वेगवेगळ्या पैलूंवर लक्ष केंद्रित करते. निष्कर्ष: जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिन प्रेस स्वातंत्र्याचे महत्त्व अधोरेखित करतो आणि पत्रकारांना त्यांच्या कामात येणाऱ्या अडचणी आणि आव्हानांबद्दल जागरूकता वाढवतो. हा दिवस लोकशाही, पारदर्शकता आणि मानवाधिकार यांसारख्या मूल्यांचा आधार आहे. (विविध प्रसार माध्यमांवरून साभार.)

!! विश्व पत्रकारिता स्वातंत्र्य दिनाच्या सर्व पत्रकार बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार आनंदी
गोविंदा निकोडे गुरुजी,
रामनगर वॉर्ड, गडचिरोली

## जगातील नागरिकांसाठी योग आरोग्यदायी आधार- केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------






योग विद्या भारतीय परंपरेचा एक भाग आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या परिश्रमातून योग जगासाठी अमूल्य भेट ठरला आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात जगभरातील विविध देशातील नागरिक सहभागी होत आहेत. यामुळे जगातील नागरिकांसाठी योग विद्या आरोग्यदायी आधार ठरली आहे, असे प्रतिपादन केंद्रीय आयुष मंत्रालय व स्वास्थ आणि कल्याण मंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांनी येथे केले.

केंद्रीय आयुष मंत्रालयातर्फे आज सकाळी गौरी पटांगण, नाशिक येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाचा ५० वा योग दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार भास्कर भगरे, आमदार सीमा हिरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. माधुरी कानिटकर, मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थेचे डॉ. काशिनाथ समगण्डी, योग विद्या गुरुकुलचे डॉ. विश्वास मंडलिक आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते योग संगम पोर्टलचे उद्घाटन करण्यात आले.

केंद्रीय मंत्री श्री. जाधव म्हणाले की, नाशिक शहर हे अध्यात्म आणि संस्कृतीचे केंद्र आहे. दर १२ वर्षांनी येथे कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. कुंभमेळा आस्था आणि परपंरेचा संगम आहे. त्याच प्रमाणे योग स्वास्थ्य, संस्कृती आणि एकतेचा संगम ठरेल. गोदावरी नदीच्या काठावर योग दिनाचा कार्यक्रम होत आहे ही समाधानाची बाब आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून २०२५ रोजी विविध कार्यक्रम होणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून हा कार्यक्रम होत आहे. योग दिनाच्या माध्यमातून 'वसुधेव कुटुंबकम' ही संकल्पना साकारली जात आहे. योग दिन हा एक उत्सव आहे. यातून मानवी जीवनात सकारात्मक बदल घडून येण्यास मदत होते. योग दिनाचा कार्यक्रम आंतरराष्ट्रीय उत्सव झाला आहे, असेही त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी 'मन की बात' या कार्यक्रमातून आंतरराष्ट्रीय योग दिनाची 'एक पृथ्वी, एक स्वास्थ्यासाठी योग' अशी संकल्पना मांडली आहे. त्यामुळे जागतिक आरोग्यासाठी भारत प्रतिबद्ध असल्याचे स्पष्ट होते, या उपक्रमातून जग एक परिवार असल्याची भावना अंगीकारावी. यातून योगाचे होणारे लाभ याविषयी माहिती द्यावी, असेही मंत्री जाधव यांनी सांगितले. आयुष मंत्रालयाच्या संयुक्त सचिव डॉ. मोनालिसा दास यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी योगाची विविध प्रात्यक्षिके सादर केली.

## जुन्या वादातून दोघांवर धारदार शस्त्राने हल्ला एका इसमाचा मृत्यू, एकाची प्रकृती गंभीर

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------

नाशिक शहरात गुन्हेगारी घटनांमध्ये सातत्याने वाढ होताना दिसत आहे. काल (गुरुवारी) मध्यरात्री नाशिकरोड- जेलरोड परिसरात झालेल्या प्राणघातक हल्ल्यात एका तरुणाचा मृत्यू झाला, तर दुसरा तरुण गंभीर जखमी झाला आहे. हल्ल्यात मृत्यू झालेल्याचे नाव रितेश डोईफोडे (वय अंदाजे २५) असे असून, प्राथमिक माहितीनुसार जुन्या वादातून हा हल्ला झाला असल्याचे बोलले जात आहे. घटनेनं तर हल्ले खोराने स्वतः हून नाशिकरोड पोलीस ठाण्यात हजर होत गुन्ह्याची कबुली दिली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.




**प्राणघातक हल्ला मध्यरात्रीच्या सुमारास:**

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री सुमारे १२ वाजता जेलरोड भागात दोन तरुणांवर धारदार शस्त्र आणि दगडाने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात रितेश डोईफोडे याचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचा मित्र गंभीर जखमी झाला आहे. जखमीवर बिटको रुग्णालयात उपचार सुरू आहेत.


**हल्लेखोर पोलीस ठाण्यात हजर:**

हल्ल्यानंतर आरोपीने स्वतः नाशिकरोड पोलीस ठाण्यात हजर होत आत्मसमर्पण केले. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. दरम्यान, रितेशचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आला आहे.

## उष्म्यात वाढ असताना शनिवारपासून अवकाळीची शक्यता

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



कधीकाळी थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखले जाणारे नाशिक मेच्या प्रारंभीच आणखी तापले आहे. शुक्रवारी उन्हाचे तीव्र चटके आणि प्रचंड उकाड्याने शहरातील उच्चांकी तापमानाचा विक्रम मोडीत निघण्याची धास्ती व्यक्त झाली. दुसरीकडे शनिवार ते मंगळवार या कालावधीत वादळी वारा, विजांच्या कडकडाटासह काही भागात पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. थंड हवेसाठी ओळखल्या जाणाऱ्या नाशिकच्या हवामानात मागील काही वर्षात कमालीचे बदल झाले. एप्रिलमध्ये पाऱ्याने ४१ अंशाचा टप्पा ओलांडला होता. मागील महिन्यात अधिक काळ उष्णतेची लाट आल्याची स्थिती होती. मे महिना त्यापेक्षा चटके देणारा ठरण्याची शक्यता आहे. या महिन्याच्या पहिल्याच दिवशी पारा उंचावून ४० अंशावर पोहोचला. दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी ३९.९ अंशाची नोंद झाली. सकाळपासून उन्हाचा तडाखा जाणवत होता. उन्हाची तीव्रता अधिक होती. त्यामुळे जनजीवनावर विपरित परिणाम झाल्याचे दिसत होते. उन्हाचे चटके बसत असल्याने दुपारी प्रमुख रस्ते, बाजारपेठेतील वर्दळ ओसरलेली होती. वातावरणात कोरडेपणा होता. दिवसा आणि रात्री कमालीचा उकाडा आहे.

**वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज**

शनिवार ते मंगळवार या कालावधीत जिल्ह्यातील काही भागात तसेच घाटमाथ्यावर वादळी वारा, विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे. एप्रिलमध्ये अवकाळी पावसाचा फटका अनेक भागास बसला होता. त्याची पुनरावृत्ती मेमध्येही होण्याचा अंदाज आहे. पुढील चार दिवस ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. काही भागात विजांच्या कडकडाटात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडू शकतो, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७